आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, १८ जानेवारी २०२२ । वर्ष : ४ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ११ । पाने : ४ । मूल्य २ ₹

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड



## शेकाप'चा आधारवड कोसळला

कोल्हापूर : शेतकरी कामगार पक्षाचे ज्येष्ठ नेते प्राध्यपक एन.डी. पाटील यांचं निधन झालं आहे. कोल्हापुरात उपचारादरम्यान वयाच्या ९३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. वातावरणात बदल झाल्याने त्यांना थोडी अस्वस्थता वाटत होती, त्यामुळे त्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले होते. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत त्यांना करोनाचा संसर्ग देखिल झाला होता. परंतू या वयात देखिल त्यांनी कोरोनावर यशस्वीपणे मात केली होती. एक झुंजार नेतृत्व अशी त्यांची ओळख होती. कामगार, शेतकरी यांच्या अनेक प्रश्नांसाठी ते कायम लढत राहिले.

# जिल्ह्यात अपघातांचा कहर

## आठवड्यात सहा जणांचा मृत्यू; अनेक जण जखमी





प्रतिनिधी

बीड : जिल्ह्यात अपघातांनी कहर केला असून आठवडाभरात झालेल्या विविध अपघातांमध्ये सहा जणांचा मृत्यू झाला आहे. तर अनेक जण जखमी झाले आहेत. दरम्यान, वाहनांवरील नियंत्रण सुटल्याने अपघात वाढले असून याबाबत वाहनधारकांनी दक्षता बाळगावी असे आवाहन पोलिसांमार्फत करण्यात आले आहे.

बीड-परळी महामार्गावर परळीकडून भरधाव वेगात येणाऱ्या स्विप्ट डिझायर गाडीची बाभळीच्या झाडाला जोरात धडक बसून अपघातात दोन जण जागीच ठार तर एक जण गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना रविवार, दि.१६ जानेवारी रोजी दुपारी तेलगाव येथे घडली. हा अपघात एवढा भीषण व हृदयद्रावक होता की यात गाडीचा पूर्ण चक्काचूर होऊन, मयत व जखमींना जेसीबीच्या सहाय्याने बाहेर काढण्यात आले. नांदेड जिल्ह्यातील भोकर येथील तीन तरूण रविवारी एम.एच.१३ सीके ०४४१ या स्विप्ट डिझायर गाडीने भोकर येथून तेलगाव मार्गे बीडला जात असताना तेलगाव येथे परळी रोडवर असलेल्या अमर बिअर बारजवळ सदर गाडी आली असता चालकाचे स्टेरिंगवरील नियंत्रण सुटल्याने गाडी रोडच्या लगत खड्यात असलेल्या बाभळीच्या झाडाला जाऊन धडकल्याने अपघात घडला.तर दुसरी घटना गेल्या रविवारी पहाटेपासूनच वातावरणात बदल झालेला होता. दाट धुके पसरले होते. बसचालक समोरील वाहनास ओव्हरटेक करताना समोरून आलेला ट्रक दिसला नाही. पुढे जाण्याच्या प्रयत्नात ट्रकवर डाव्या बाजूला आदळल्याने व जोराची धडक बसल्याने पत्रा फाटत जाऊन दोन्ही वाहनांचा चक्काचूर झाला. अंबाजोगाई-लातूर महामार्गावरील नांदगाव फाट्याजवळ एस.टी.बस व ट्रकची समोरासमोर धडक झाली. या भीषण अपघातात चौघे जागीच ठार झाले. वाहकासह तीन प्रवाशांचा मृतांत समावेश आहे. ९ जानेवारी रोजी सकाळी साडेआठ वाजता ही घटना घडली. औरंगाबाद आगाराची बस (एमएच २० बीएल-३०१७) लातूरहून औरंगाबादकडे जात होती तर औरंगाबादहून यंत्रसामग्री घेऊन ट्रक (केए ५६-५४९४) हैदराबादकडे जात होता. नांदगाव फाट्याजवळ दोन्ही वाहनांची समोरासमोर धडक झाली. यात बसमधील चौघे जागीच ठार झाले आहेत. तर १५ जण गंभीर जखमी झाल्याची दुर्दैवी घटना देखिल गेल्या रविवारीच घडली आहे. दरम्यान, गेल्या आठ दिवसांत दाट धुक्यांमुळे अपघात वाढले असल्याचा प्रतिक्रिया वाहनधारकांनी दिल्या आहेत.

## फास्टट्रॅकन्यूज



### ज्ञानमंदिरे खुली करा; 'स्कूल चले हम' आंदोलन

बीड : जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव कमी असल्याने, शहरातील शाळा ५० टक्के तर ग्रामीण भागातील शाळा शंभर टक्के सुरू करा. या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्त्यांकडून स्कूल चले हम आंदोलन करण्यात आले आहे. मंदिर आणि मदिरालय खुले असताना, केवळ ज्ञानार्जनाचीचे मंदिर बंद का? असा सवाल उपस्थित करून जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर सामाजिक संघटनेने आंदोलन छेडले आहे. शाळा बंद राहिल्याने नवी पिढी दिशाहीन होत असून त्यांचे बौद्धिक, शारीरिक आणि मानसिक खच्चीकरण होत आहे. ऑनलाईन शिक्षण पद्धतीने शिक्षणाचा खेळखंडोबा होतो आहे. त्यामुळे नियम आणि अटी पाळून शाळा सुरू करण्यात याव्या अशी मागणी यावेळी करण्यात आली आहे.

### तहसिलदार ॲम्ब्युलन्सने पाठलाग करतात तेव्हा...

बीड : गोदावरी नदी पात्रातू अवैध वाळुचा उपसा सुरुच आहे. रात्री तहसिलदार सचिन खाडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी ॲम्ब्युलन्सद्वारे पाठलाग करून वाळुचा हायवा पकडला. गेवराई ते रांजणी फाट्या दरम्यान वाळुचा हायवा जात असल्याची माहिती तहसिलदार सचिन खाडे यांना झाल्यानंतर ते व त्यांचे सहकारी एका ॲम्ब्युलन्सद्वारे हायवाचा पाठलाग करत होते. वंजारवाडी फाट्याजवळ त्यांनी साडे अकरा वाजता हायवा पकडला. सदरील ही कारवाई तहसिलदार सचिन खाडे, गौण अधिकारी आसुळ, पखाले, काशिद, कुरळकर, ससाणे, सानप यांनी केली. हायवासह वाळु असा एकूण ४० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



### कोरोनाचे मीटर वाढले; मात्र माजलगावचा आकडा अल्प

माजलगाव : बीड जिल्ह्यात कोरोनाचे मीटर वाढले असून रूग्णसंख्या १२९ वर पोहोचली आहे. मात्र माजलगावची रूग्णसंख्या केवळ दोनच असल्याने समाधान व्यक्त केले जात आहे. दरम्यान, माजलगाव पाठोपाठ धारूर आणि गेवराईत तालुक्यातही अल्प रूग्ण आढळून आले आहेत. बीड जिल्ह्यात सोमवार, दि.१७ जानेवारी रोजी प्राप्त झालेल्या अहवालामध्ये जिल्ह्यातील १०५६ जणांच्या तपासण्या करण्यात आल्या होत्या. त्यात १२९ जण कोरोना पॉझिटिव्ह असल्याचे निष्पन्न झाले तर ९२७ जणांचा अहवाल निगेटिव्ह आला आहे. सोमवारच्या अहवालात आढळलेले रूग्ण जिल्ह्यात अंबाजोगाई २०, आष्टी ३, बीड ५९, धारूर २, गेवराई २, केज ९, माजलगाव २, परळी ७, पाटोदा १२ शिरूर ७ वडवणी ६ असे रूग्ण आढळून आले आहेत.



## ऑनलाईन नको, ऑफलाईन शिक्षण हवे

### विद्यार्थ्यांनी घेतली तहसिल कार्यालयाकडे धाव

प्रतिनिधी

माजलगाव : ऑनलाईन नको, ऑफलाईन शिक्षण हवे, अशा मागणीचे निवेदन तहसिल कार्यालयात श्री सिध्देश्वर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दिले. ऑनलाईन शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानार्जनात अडथळे येत असून त्यासाठी ऑफलाईन वर्ग सुरू व्हावेत, असे निवेदन श्री सिध्देश्वर महाविद्यालयाच्या बारावीत शिक्षण घेणाऱ्या विज्ञान शाखेचे विद्यार्थी विशाल होके, अमोल कांबळे, अथर्व शिंदे, गोविंद गिरी, अतुल विघ्ने, दिगंबर शिंदे, पवन थेटे यांनी दिले. ऑफलाईन शिक्षणासाठी आंदोलन सुरु आहेत.

### राशनच्या काळ्याबाजाराचे गुजरात कनेक्शन उघड

प्रतिनिधी

बीड : बीडहून गुजरातला राशनचा तांदुळ जात असल्याची माहिती शिवाजीनगरच्या डीबी पथकाला झाल्यानंतर त्या पथकाच्या अधिकाऱ्यांनी जालना रोडवरील साई पॅलेससमोर ट्रक ताब्यात घेतला. या ट्रकमध्ये जवळपास ३० टन तांदूळ असल्याचे सांगण्यात आले. सदरील हा तांदुळ कोणाचा आहे? याची चौकशी सुरू होती. दुपारी बीड शहरामधून ट्रक (क्र.एम.एच. २३ डब्ल्यू.३४९५) यामध्ये राशनचा तांदुळ जात असल्याची माहिती शिवाजीनगरच्या डीबी पथकाला झाल्यानंतर पथकाचे प्रमुख बाळराजे दराडे, फेरोज पठाण सह आदींनी जालना रोडवरील साई पॅलेससमोरून सदरील ट्रक ताब्यात घेतला. या ट्रकमध्ये जवळपास ३० टन तांदूळ असल्याचे सांगण्यात आले. हा तांदुळ बीडमधून गुजरातकडे जात होता.





# 'मूकनायक'ने केला दबलेल्या समाजाचा आवाज बुलंद

## आमदार प्रकाश सोळंके यांचे प्रतिपादन; विष्णू बुरगे यांच्यासह मान्यवरांचा झाला गौरव

प्रतिनिधी

माजलगाव : 'मूकनायक'ने दबलेल्या,



पिचलेल्या समाजाचा आवाज बुलंद करण्याचे काम केले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता सत्याचा पुरस्कार करणारी होती, असे प्रतिपादन माजलगावचे आमदार प्रकाश सोळंके यांनी केले. ते मूकनायक दिनाच्या निमित्ताने विविध पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते. यावेळी झी २४ तासचे प्रतिनिधी विष्णू बुरगे यांना मूकनायक पुरस्कार प्रदान करण्यात आला. विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींनाही यावेळी गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील तर आमदार प्रकाश सोळंके, माजी मंत्री बदामराव पंडित, मुंबई बाजार समितीचे सभापती अशोक डक, माजलगाव बाजार समितीचे सभापती संभाजी शेजुळ, माजी सभापती जयदत्त नरवडे, धम्मानंद साळवे, अरूण राऊत, श्रीहरी मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात रामेश्वर कानडे, कल्याण आबुज, डॉ.अमोल परतुरकर, ॲड. पल्लवी सोळंके, पंजाब डख, सौरभ जाधव, रूपाली कचरे, ॲड.प्रमोद तौर, रविंद्र शेजुळ, मधुकर कदम, चंद्रमुनी डोंगरे, ऋषिकेश जेथलिया यांचा सन्मान करण्यात आला. विविध



दैनिकात काम करून आपले अग्रलेखातून विविध सामाजिक विषयाकडे प्रशासनाचे लक्ष वेधणारे प्रा.रविंद्र तहकीक हे मात्र यावेळी आजारपणामुळे हजर राहू शकले नाहीत तर विष्णु बुरगे यांना मूकनायक पुरस्काराने मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले.

आमदार प्रकाश सोळंके म्हणाले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी पत्रकारितेची चळवळ उभा केली त्याला समर्पक असे नाव दिले त्याच नाव 'मूकनायक' गोरगरीब, वंचितांचा, शोषितांचा आवाज म्हणून मूकनायक सुरू झाले आणि खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य संग्रामाला धार आली. समाजाच्या वेदना व विद्रोह प्रकट करण्यासाठी सुरू केलेले मराठी भाषेतील एक पाक्षिक होते.

जानेवारी १९२० रोजी या पाक्षिकाचा पहिला अंक प्रकाशित करण्यात आला. सूत्रसंचालन देशमुख यांनी तर आभार दिगंबर सोळंके यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र पत्रकार संघाचे मार्गदर्शक किशोर प्रधान, अध्यक्ष वाजेद पठाण, उपाध्यक्ष परमेश्वर सोळंके, दिगंबर सोळंके, संतोष जेथलिया, रविंद्र राऊत, संतोष रासवे, हमीद शेख, सचिन नाईक, धनंजय माने, सिद्धेश्वर गायकवाड, गणेश तौर यांनी परिश्रम घेतले.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

## संपादकीय

# ओमायक्रॉनची धास्ती

कोरोनाच्या तिसऱ्या संभाव्य लाटेची सर्वत्र चर्चा होताना दिसत आहे. अशातच ओमायक्रॉन पाय पसरत आहे. ही धोक्याची घंटा समजायची का? असा प्रश्न सामान्यजनांना पडला आहे. एव्हाना अवघ्या जगाबरोबरच आपला देशही ओमायक्रॉनच्या विळख्यात सापडला आहे. दुर्दैवाने या विषाणूच्या संसर्गाची तीव्रता वाढत आहे. ओमायक्रॉनच्या धोक्याविषयी आणि संभाव्य लाटेची पूर्वसूचना अलीकडेच समोर आली होती. ही लाट महाप्रचंड असेल, मागच्या दोन्ही कोरोना लाटांमधल्या बाधितांपेक्षा या लाटेतल्या बाधितांची संख्या जास्त असेल, असं या क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी बोलताना उमगलं होतं. आज दुर्दैवाने ते सत्यात उतरलं आहे. त्यातच पाच राज्यांच्या निवडणुका जाहीर झाल्या. निवडणुका म्हणजे प्रचार आला. प्रचार म्हणजे शक्तिप्रदर्शनाच्या सभा आल्या. सुदैवाने या वेळी निवडणूक आयोगानं अशा प्रकारच्या मेगा इव्हेंट्सवर, प्रचार सभांवर तात्पुरती बंदी आणली आहे. नागरिकांनी देखील देवळांमधून गर्दी करू नये, सार्वजनिक स्थळी गर्दी वाढवू नये हे अधिक श्रेयस्कर. हे सर्व टाळण्यासाठीच अनेक राज्यांमध्ये रात्रीची संचारबंदी लागू करण्यात आली. त्यांचं पालन होण्याच्या दृष्टीने मात्र फारशा कठोर उपाययोजना झालेल्या दिसत नाहीत. त्यामुळे रात्री तुरळक का होईना, रस्त्यावर रहदारी असते. याचाच परिणाम म्हणून सध्या देशात दिवसाला दीड लाखांहून अधिक रुग्णसंख्या वाढत आहे. पश्चिम बंगाल सोडून गोवा विधानसभेत मुसंडी मारण्याची स्वप्नं पाहणाऱ्या ममता बॅनर्जींना स्वत:च्या राज्यातला ओमायक्रॉनचा फैलाव रोखण्यात सपेशल अपयश आलं आहे. जी गत पश्चिम बंगालची तेच महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान आणि केरळ या राज्यांचं. सुशासनाचे ढोल पिटणाऱ्या केजरीवालांची दिल्ली ओमायक्रॉनच्या प्रसाराचा केंद्रबिंदू ठरली. हे नि:संशय जसं त्या त्या राज्यांचं अपयश आहे तसंच नागरिकांच्या मनोवृत्तीचंही लक्षण आहे. ईशान्येकडची छोटी राज्यं लसीकरणात आघाडीवर दिसतात. कोरोनाचा प्रसार रोखण्यात यशस्वी झालेली दिसतात. इथेही राज्यांच्या स्वायत्ततेबद्दल रोज उठून बोलणारी आणि प्रत्येक गोष्टीसाठी केंद्राला जबाबदार धरणारी राज्यं आणि त्यांचं प्रशासन यानिमित्ताने उघडं पडलं आहे. आता कोरोनाची घरी करावयाची टेस्ट कीट्स २००-२५० रुपयांत सर्रास उपलब्ध आहेत. त्यातून येणारे निकाल आणि रुग्णसंख्या दैनंदिन आलेखात कुठेच दिसत नाहीत. इतकंच काय, तर कोणतीही किंवा फारशी लक्षणं नसलेले हजारो बेफिकीर क्षणाक्षणाला हा रोग पसरवत आहेत. आधीच्या डेल्टा आणि कोरोना विषाणूपेक्षा ओमायक्रॉन अनेकपट वेगाने चटकन पसरत आहे. सर्वजण एकच प्रश्न विचारत आहेत, ओमायक्रॉन कधी संपणार? दोन लसी घेतल्यानंतर आपल्याला ओमायक्रॉनची बाधा होणार नाही, अशा भ्रमात अनेकजण होते. त्यांच्या भ्रमाचा भोपळा जगभरात फुटला आहे. फायझर आणि मॉडेर्ना या लसींची प्रतिकारशक्ती भारतीय लसीच्या अनेक पटींनी जास्त आहे. म्हणून नाकं मुरडणाऱ्यांनी एकदा युरोप, अमेरिकेतले ओमायक्रॉन प्रसाराचे आकडे पाहावेत. इथे दोन वेळा लस घेतलेले लसवंत आज ओमायक्रॉनबाधित आहेत. भले रोगाची तीव्रता कमी असेल, फुफ्फुसांपर्यंत त्याचा संसर्ग पोहोचत नसेल, त्यामुळे न्युमोनिया आदी गंभीर आजारांना सामोरे जावे लागत नसेल आणि साध्या तापाच्या गोळ्या-औषधांवर निभावलं जात असेल; तरीदेखील बाधितांची संख्या धडकी भरवणारी आहे. म्हणूनच अगदी एक टक्का रुग्णांना रुग्णालयात भरती करावं लागलं तरी, तो आकडा भारतासह इतर सर्व देशांमध्ये वेगाने वाढतोय. याचा अर्थ दोन लसी घेऊन आपल्यात कोणतीही प्रतिकारशक्ती निर्माण झाली नाही का? तर तसं नाही. प्रतिकारशक्ती निर्माण झाली. पण काही महिन्यांनंतर त्याची प्रतिकारशक्ती कमी झाली एवढाच त्याचा अर्थ आहे. या वर्षाच्या सुरुवातीपासून तिसऱ्या डोसची दारं सरकारने एका विशिष्ट वयोगटासाठी खुली केली. यामुळे प्रतिकारशक्ती वाढून त्यांचा ओमायक्रॉनपासून बचाव होईल एवढं निश्चित. त्यामुळे यापुढील आयुष्यात कोरोना प्रतिबंधक लसीच्या तीन ते चार मात्रा याच न्यू नॉर्मल' आहेत हे समजणे श्रेयस्कर. मागील लाटेपेक्षा या लाटेमध्ये काही चांगल्या गोष्टी पाहायला मिळत आहेत. मागील वेळी लोकांमध्ये प्रचंड प्रमाणात भीती पसरली होती. ऑक्सिजन, बेड, हॉस्पिटल, रेमडेसिविर यांची कमतरता होती. अनेकांची लस टोचणी झाली नव्हती. आज भाग्यवंत लसवंतांची संख्या लस न घेतलेल्यांपेक्षा अनेक पटींनी जास्त आहे. ही मोठी जमेची बाजू आहे. त्यामुळे प्रसार झाला तरी रुग्ण भरती आणि मृत्यू दर याची धडकी भरत नाही, हे पाहायला मिळत आहे. मग प्रश्न असा आहे की, बाधितांच्या संख्येचा जो दर आज दीड-पावणेदोन लाखांनी वाढत आहे, त्याचा उच्चांक कधी येईल? तज्ज्ञांच्या एका गटाच्या मते सर्वसाधारणपणे हीच रुग्णसंख्या वाढत जाऊन संपूर्ण देशभरातला आकडा चार-साडेचार लाखांवर स्थिरावेल आणि नंतर ज्या वेगाने त्याचा प्रसार झाला, तसाच त्या रोगाचा निचरादेखील होईल. अर्थात हे सर्व होण्यासाठी नागरिकांनी काटेकोर काळजी घेणं आवश्यक आहे. ओमायक्रॉनचा प्रसार कमी होणं हे जेवढं सरकारी धोरणांवर अवलंबून आहे, त्यापेक्षा अधिक नागरिकांच्या हातात आहे. कोरोनाच्या या तीनही लाटांनंतर एक लक्षात आलं. कोरोनाचा संपूर्ण नाश जवळपास अशक्य आहे. त्याबरोबर राहायला शिकण्याची गरज अधोरेखीत होत आहे. त्याचबरोबर कोरोनाच्या लढाईत आपल्या ध्येयांची पुनर्मांडणी करावी लागेल. ताज्या लाटेतली एक चांगली बाब म्हणजे मागच्या लाटेप्रमाणे अर्थव्यवस्थेला मोठा तडा पडलेला नाही. अर्थचक्र व्यवस्थित सुरू आहे. इतकंच काय, तर ऑक्टोबर, नोव्हेंबर, डिसेंबर या तिमाहीचे निर्यातीचे आकडे उच्चांक गाठत आहेत. याचा अर्थ मागल्या वेळेपेक्षा आताची स्थिती खूपच चांगली आहे. एक समूह म्हणून आपण मागच्या लाटेपेक्षा अधिक शिकलो आहोत, यात शंकाच नाही. मानवी देहरचना, पेशीरचना ही उत्क्रांत होत असते. ओमायक्रॉन लवकर संपेल, अशी आशा आहे. पण निव्वळ आशा हे धोरण अथवा जीवनशैली असू शकत नाही. त्यासाठी जितकी अधिक काळजी घेऊ, तितका लवकर ओमायक्रॉन हद्दपार होईल. हे लक्षात घेऊन आता जनसामान्यांनी काळजी घेणं आणि मागील दोन लाटांमधल्या अनुभवांतून शहाणं होत निर्बंध पाळणं गरजेचं आहे. तसं झालं तर या व्याधीचा त्रास आणि त्याची चर्चा पुढील काही दिवसांमध्येच थांबलेली असेल. ओमायक्रॉनच्या व्याप्तीमुळे सामान्यजनांनी धास्ती घेतली आहे. मात्र ओमायक्रॉनबाबत दक्ष राहण्याची गरज आहे.

# सोशल विकृतीकरण थांबणार कधी?

**सुल्ली डिल, बुल्ली बाई ॲपवरून मुस्लिम महिलांच्या नकळत त्यांच्या फोटोंचा लिलाव करण्यात आला. त्याआधी विकृत पद्धतीने हे फोटो एडिट करण्यात आले. त्यासाठी पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्या, लेखक असलेल्या मुस्लिम महिलांना टार्गेट करण्यात आलं. त्यांची बदनामी करण्यात आली. यात अटक झालेले सगळेच आरोपी हे अल्पवयीन आहेत. सोशल मीडियातून द्वेषाचं कोडिंग सेट केलं जातंय. ही अल्पवयीन मुलं त्याचे बळी ठरलीत.**

गेल्या काही वर्षांमधे समाजाबद्दल द्वेष पसरवणं फार सोपं होऊन गेलंय. कधी हे सगळं उघड केलं जातं. तर कधी एखादं फेक अकाउंट, पेज काढून. त्यासाठी सोशल मीडियातून चुकीच्या पोस्ट फिरवून संभ्रम निर्माण केला जातो. हल्ली व्हाट्सएप युनिवर्सिटीतून आपल्यापर्यंत आलेली प्रत्येक गोष्ट खरी वाटायला लागते. हे खोटं खरं म्हणून सगळीकडे वायरल होतं. तेच द्वेषाचं कारण ठरतं. सोशल मीडियातून सातत्याने काही ठराविक मंडळी मुस्लिम समाजाला टार्गेट करतायत. फेक गोष्टी पसरवून द्वेषाचं कोडिंग सेट केलं जातंय. त्यावर विचार करायला आपल्याकडे वेळही नाही. या सगळ्यात मुस्लिम महिला सॉफ्ट टार्गेट ठरतायत. विशेषतः ज्या सरकारच्या चुकीच्या धोरण, निर्णयांविरोधात भूमिका घेतात. बुल्ली बाई, सुल्ली डिलसारखे ॲप अशा महिलांच्या बदनामीचं षडयंत्र आहे.



**सुल्ली डिलची नवी आवृत्ती**

गिटहबवर सुल्ली डिल हा ॲप बनवण्यात आला. ४ जुलै २०२१ला पहिल्यांदा सुल्ली डिलवरून मुस्लिम महिलांचे फोटो अपलोड करण्यात आले. सुल्ली, बुल्ली हे आक्षेपार्ह शब्द मुस्लिम व्यक्तीला टार्गेट करण्यासाठी म्हणून वापरले जातात. याच शब्दांचा वापर करून मुस्लिम महिलांची बदनामी करण्यात आली. सुल्ली डिलवर गेल्यावर युजरला 'फाईंड युवर सुल्ली डिल ऑफ द डे'वर क्लिक करायला सांगितलं जातं. ते केल्यावर 'सुल्ली डिल ऑफ द डे'मधे तुम्हाला एखाद्या मुस्लिम महिलेचा फोटो दिसतो. हे फोटो त्या महिलेच्या सोशल मीडिया अकाउंटवरून तिच्या नकळत घेतले जायचे. ट्विटरवर 'डिल ऑफ द डे' असं लिहत यात मुस्लिम महिलांना टॅग केलं जायचं. या फोटोंचे लिलाव व्हायचे. बुल्ली बाई ॲप सुल्ली डिलसारखंच काम करायचं. मुस्लिम महिलांच्या बदनामीचं हे दुसरं वर्जन म्हणता येईल. बुल्ली बाई ॲपही गिटहबवर बनवण्यात आलं होतं. १ जानेवारीला अचानक वेगवेगळ्या क्षेत्रातल्या मुस्लिम महिलांचे फोटो या ॲपवरून अपलोड करण्यात आले.

**प्रकरण गांभीर्याने घेतलं नाही**

जुलैमधे सुल्ली डिलची घटना घडली होती. त्यावेळी ८० पेक्षा अधिक मुस्लिम महिलांचे फोटो चुकीच्या पद्धतीने अपलोड करण्यात आले होते. संसदेतही या विषयावर चर्चा झाली. केंद्रीय महिला आयोगानेही हा मुद्दा तेव्हा गांभीर्याने घेतल्याचं म्हटलं होतं. केस दाखल झाली. पण त्यात पुढे काहीच झालं नाही. गिटहबच्या अधिकारी एरिका ब्रेशिया यांनी त्यावेळी गिटहबवरून सुल्ली ॲप हटवत असल्याचं म्हटलं होतं. लगोलग ते ब्लॉकही करण्यात आलं. पण पोलिसांच्या पातळीवर ज्या प्रकारे तपास व्हायला हवा तो झालाच नाही. मुंबई, दिल्लीत एफआयआर दाखल झाले. पण ५ महिने उलटून गेले तरीही कुणाला अटक किंवा चौकशी झाली नाही.

**आज-काल**
**अक्षय शारदा शरद**

**मुस्लिम महिला सॉफ्ट टार्गेट**

इस्मत आरा द वायरच्या पत्रकार आहेत. त्या सरकारच्या चुकीच्या धोरणांवर टीका करत असतात. त्यांचाही फोटो बुल्ली ॲपवर टाकण्यात आला होता. त्याविरोधात त्यांनी दिल्ली पोलिसांच्या सायबर सेलकडे तक्रारही दाखल केली होती. प्रसिद्ध रेडिओ जॉकी असलेल्या सायमा यांनाही अशाच प्रकारे टार्गेट करण्यात आलं होतं. प्रसिद्ध अभिनेत्री शबाना आझमी, लेखिका नबिया खान, पत्रकार हिबा बेग यांचंही नाव या बुल्ली बाई ॲपच्या लिस्टमधे होतं. पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्या, राजकीय महिला नेत्यांची नावं यात होती. अशा १०० पेक्षा अधिक मुस्लिम महिलांची एक लिस्ट तयार करण्यात आली होती. विकृत पद्धतीने फोटो एडिट या महिलांच्या फोटोंचा लिलाव करण्यात येत होता. इस्मत आरा, सायमा यांनी ट्विट करून याबद्दल संतप्त प्रतिक्रिया दिलीय. मुस्लिम समाजातल्या एका महिलेनं वेगवेगळ्या मुद्यावर आवाज उठवणं मान्य नसल्यामुळेच अशाप्रकारच्या विखाराला खतपाणी घातलं जातं असल्याचं त्यांचं म्हणणं आहे. गेल्या काही वर्षांमधे जो काही द्वेष पसरवला जातोय त्याचं मुस्लिम महिला सॉफ्ट टार्गेट ठरतायत.

**अल्पवयीन ॲपचे मास्टरमाइंड**

बुल्ली बाई ॲपनंतर तक्रारी दाखल करण्यात आल्या. वाद निर्माण झाला. शिवसेनेच्या राज्यसभा खासदार प्रियांका चतुर्वेदी यांच्यासोबत अनेकांनी याविरोधात आवाज उठवला. इस्मत आरा यांनी एफआयआर दाखल केला. त्यामुळे केंद्रिय माहिती आणि तंत्रज्ञान खात्याचे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी चौकशीची घोषणा केली. त्यानंतर गिटहबवरून बुल्ली ॲप ब्लॉक करण्यात आलं. बुल्ली बाई प्रकरणात श्वेता सिंग, नीरज बिष्णोई, विशाल झा, मयांक रावळ यांना अटक झालीय. हे सगळे २५ वर्षांच्या आतले आहेत. यातला नीरज बिष्णोई बुल्ली बाई ॲपचा मास्टरमाइंड आहे. त्याचं वय अवघं २१ वर्ष असून तो बीटेकच्या दुसऱ्या वर्षात शिकतोय. यातल्या विशाल झानं तर वादग्रस्त ट्विट करण्यासाठी एक फेक अकाउंटही काढलं होतं. जे ट्विटरनं ब्लॉक केलं. सुल्ली डिलचा मास्टरमाइंड ओंकारेश्वर ठाकूर आहे. त्याला इंदूरमधून अटक करण्यात आलीय. ट्रोल आणि बदनामीसाठी ट्विटरवर 'ट्रॅडिशनलिस्ट' नावाचा एक ग्रुप तयार करण्यात आला होता. यात केवळ मुस्लिमच नाही तर दलित, शीख, ख्रिश्चन समाजाविरोधात हिंसक कारवायांसाठी प्रोत्साहन दिलं जायचं. ओंकारेश्वर या ग्रुपचा सदस्य होता. बुल्ली बाई ॲपचा मास्टरमाइंड नीरज हा ओंकारेश्वर ठाकूरच्या संपर्कात असल्याचं त्यानं पोलीस चौकशीत सांगितलंय.

**तरुणांआडून द्वेषाची पेरणी**

मास्टरमाइंड असलेली सगळी मुलं पंचवीशीच्या आतली आहेत. यातली उत्तराखंडची श्वेता सिंग १८ वर्षांची आहे. तिच्या आईचं कॅन्सरने तर वडलांचं कोरोनाने निधन झालंय. तिच्या घरची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. महत्वाचं म्हणजे श्वेता सिंगच्या ट्विटर अकाउंटवरून मुस्लिम महिलांचे फोटो बुल्ली बाई ॲपवर अपलोड केले जायचे.

या दोन्ही प्रकरणात अल्पवयीन मुलांची नावं समोर येत असली तरीही यामागे मोठ्या व्यक्तींचे हात असू शकतात. तसा संशय मुंबई पोलिसांनी व्यक्त केलाय. मुंबईचे पोलीस आयुक्त हेमंत नगराळे यांनी मुस्लिम महिलांच्या बदनामीसाठीच हे ॲप बनवल्याचं म्हटलंय. शिवाय या अकाउंटचा संबंध खलिस्तान्यांशी जोडून हिंसा, द्वेष पसरवण्याची योजना होती. समाजात तेढ निर्माण करण्यासाठी या मुलांच्या खांद्यावर बंदूक ठेवली गेली. मागच्या काही वर्षांमधे सातत्याने मुस्लिम समाजाबद्दल द्वेष पसरवला जातोय. सोशल मीडियातून या सगळ्याला खतपाणी मिळतंय. वेगवेगळ्या संघटनांमुळे ही द्वेषाची पेरणी होतेय. तरुणाईची माथी भडकवली जातात. या दोन्ही प्रकरणांमधे सापडलेले मास्टरमाइंड याचेच बळी ठरलेत.

# एडवर्ड ऑसबॉर्न विल्सन 'निसर्गपुत्र'

**अवघ्या सृष्टीचा विचार करणारे एडवर्ड ऑसबॉर्न विल्सन यांचं नुकतंच निधन झालं. ते निसर्गपुत्र' होते. मुंग्या हा अभ्यासाचा विषय असल्याने त्यांच्या विविध जाती शोधण्यासाठी त्यांनी खूप प्रवास केला. त्यांनी मुंग्यांच्या विविध अशा ४०० प्रजाती शोधून काढल्या. विल्सन यांना उत्क्रांतीची उकल करणारे चार्ल्स डार्विन यांचा वारसदार मानलं जातं.**

आपल्या भावभावना या अश्मयुगीन काळातल्या असाव्यात अशा आहेत. प्रथा-परंपरा-रीती-प्रघात हे मध्ययुगीन काळाला शोभेसे आहेत. पण आपल्याकडं असणारं तंत्रज्ञान मात्र दैवी शक्ती असलेलं वाटावं असं आहे' असं म्हणणारे एडवर्ड ऑसबॉर्न विल्सन हे खरं तर धर्मगुरू व्हायचे. लहान वयात ते धर्माचं शिक्षण घेत होते. त्याचवेळी त्यांनी उत्क्रांतीचा अभ्यास केला आणि त्यांच्या आयुष्याची दिशा बदलली. वसुंधरेवरच्या वेगवेगळ्या जीवजातींनी त्यांना भुरळ घातली. अनेकविध जातींचे आणि आकाराचे पक्षी यांच्याबद्दल त्यांना विलक्षण कुतूहल वाटायला लागलं. त्यांनी पक्षीविद्येचा अभ्यास करायचं ठरवलं. पण वयाच्या १३ व्या वर्षीच त्यांना विचित्र अपघात झाला. मासेमारी करत असताना माशाच्या धारदार कल्ल्याचं टोक त्यांच्या उजव्या डोळ्यात घुसलं. त्या अनपेक्षित अपघातानं त्यांच्या उजव्या डोळ्याची दृष्टी कमी झाली. त्यांना लांबवरचं पाहणं कठीण व्हायला लागलं. पक्षीविद्येचा अभ्यास करण्याचा विचार सोडून द्यावा लागला. मग त्यांनी आपलं लक्ष लहान आकाराच्या, सहज जवळून निरीक्षण करता येतील अशा कीटकांकडे वळवलं. त्यातूनही मुंगीनं त्यांना फारच भुरळ घातली. त्यांना मुंग्यांचं निरीक्षण आणि अभ्यास करण्याच्या विचारानं विलक्षण पछाडलं आणि मग ते त्यांच्या आयुष्यातलं जणू एक ध्येयच बनून गेलं.



**मुंग्यांचं प्रेम लहानपणीचा छंद**

सजीवांप्रती आपुलकी आणि प्रेम असणाऱ्या एडवर्ड ऑसबॉर्न विल्सन यांचा जन्म १० जून १९२९ला अमेरिकेतल्या अलाबामामधल्या बर्मिंगहॅम इथं झाला. त्यांचे वडील अकाऊंटंट होते तर आई सेक्रेटरी होती. एडवर्ड ८ वर्षांचे असतानाच त्यांच्या आई-वडलांचा घटस्फोट झाला. वडील मद्याच्या आहारी गेले होते. आई सोडून गेल्यानंतर लहानगा एडवर्ड झाडझाडोरा, पक्षी, कीटक, ओढे आणि नद्या यांचं निरीक्षण करण्यात रमू लागला. निसर्गाची स्पंदनं टिपू लागला. आपल्या भोवतालच्या सजीवसृष्टीनं जणू त्याच्यावर गारुड केलं. पण उजवा डोळा जवळपास निकामी झालेला असल्यानं एडवर्ड यांनी आपलं लक्ष मुंगीसारख्या लहान कीटकांकडं वळवलं. मात्र त्यावेळेस त्यांचं मुंग्यांचं प्रेम हे लहानपणीचा एक छंद इतकंच होतं. तो छंद जोपासतानाच त्यांनी अमेरिकेत परदेशांतून आलेल्या मुंग्यांची वसाहत शोधून काढली. त्यावेळी त्यांचं वय होतं १३ वर्षांचं. मात्र आपल्या वेडापायी त्यांनी अभ्यासाकडं दुर्लक्ष केलं नाही. युनिवर्सिटी ऑफ अलाबामामधून ते जीवशास्त्र हा विषय घेऊन पदवीधर झाले आणि नंतर त्याच विषयामधे पदव्युत्तर अभ्यासक्रमही त्यांनी पूर्ण केला. १९५०ला ते पीएच.डी. करण्यासाठी हार्वर्ड युनिवर्सिटीत गेले. तिथून पीएच.डी. झाल्यानंतर १९५३ला मुंग्यांचा तपास करण्याच्या मोहिमेला त्यांनी क्युबापासून सुरवात केली. तिथून ते मेक्सिको, मग न्यूगियाना इथं गेले. त्यानंतर त्यांनी आपला मोर्चा दक्षिण प्रशांत महासागरातील दुर्गम बेटांकडं वळवला.

**बेटावरच्या जीवांचा अभ्यास**

भौगोलिक प्रदेशानुसार मुंग्यांच्या जातींमधे येणारी विविधता त्यांनी पाहिली. या मुंग्या एका ठिकाणाहून दुसऱ्या जागी कशा गेल्या असाव्यात, त्यांच्यात उत्क्रांती कशी होत गेली असेल, त्यासाठी किती काळ जावा लागला असेल, याचा त्यांनी शोध घेतला. तिथून परतल्यावर त्यांनी इरने केली या तरुणीशी लग्न केलं. त्यांना कॅथरिन नावाची एक मुलगीही झाली. १९५६ला विल्सन हार्वर्ड युनिवर्सिटीमध्ये प्राध्यापक म्हणून ते काम करू लागले. जैविक विविधतेबद्दल अंदाज कसा बांधता येईल, याबाबत त्यांनी संशोधन सुरू केलं. त्यांच्याबरोबर रॉबर्ट मॅक्आर्थर हा युनिवर्सिटी ऑफ पेनसिल्वानियामधल्या जीवशास्त्राचा प्राध्यापकही काम करू लागला. या दोघांनी मिळून काम करून एखाद्या बेटावर किती प्रकारच्या जीवजाती असू शकतील, याचा अंदाज बांधणारं समीकरण विकसित केलं. या समीकरणाची चाचणी त्यांनी अगदी लहान बेटांवर घेतली. या बेटांवर तिवराची झुडपं होती. ही बेटं त्यांनी तंबू ठोकून झाकून टाकली. जमिनीवरच्या गोगलगायी हाताने गोळा करून बेटाबाहेर नेल्या. बेटावर त्यांनी अगदी कमी काळ प्रभावी असणारी कीटकनाशकं टाकली. असं करून त्यांनी त्या बेटांवरचा जैविक समतोल बिघडवून टाकला होता. पुढे त्या इटुकल्या बेटांनी आपला जैविक समतोल अगदी पूर्णपणं सावरल्याचं त्यांच्या लक्षात आलं. तिथे पूर्वी होत्या त्यापेक्षा नवीन जीव जाती आता आल्या आहेत, हेही लक्षात आलं.

**विशेष**
**श्रीराम शिधये**

**संशोधन, चिंतन आणि निरीक्षण**

या कामावर आधारित त्यांनी द थिअरी ऑफ आयलंड बायोजिओग्राफी' हे पुस्तक लिहिलं. ते १९६७ला प्रसिद्ध झालं. परिसंस्था' या विषयावरचं ते एक महत्त्वाचं पुस्तक ठरलं. या पुस्तकात त्यांनी 'बेटांचा जैवभूगोल सिद्धांत' मांडला. या विषयामध्ये काम करणाऱ्यांना तो कायमच मार्गदर्शक ठरत आला. विल्सन यांच्या कामाचं आणि त्याच्या प्रभावाचं हे एक उदाहरण. पण अशी अनेक कामं विल्सन यांनी आपल्या सहकाऱ्यांसह केली. संशोधन, चिंतन आणि निरीक्षण हाच आयुष्यभराचा ध्यास असणाऱ्या विल्सन यांनी वीसहून अधिक पुस्तकं लिहिली. त्यांच्या ऑन ह्यूमन नेचर' आणि द अँटस' पुस्तकांना पुलित्झर पुरस्कार मिळाले. नॅचरलिस्ट' हे त्यांचं आत्मचरित्र १९९०ला प्रकाशित झालं. २०१०ला त्यांची अँटहिल' नावाची कादंबरी प्रसिद्ध झाली.

**मुंग्यांच्या ४०० प्रजातींचा शोध**

आपली पृथ्वी चैतन्यानं मुसमुसलेली आहे, नवनिर्मितीक्षम आहे. तिच्यावर विस्मयचकित करणारी बहुरंगी बहुविधता आहे, इथलं सतत स्पंदनशील असणारं जीवन हे मोठं लोभस आहे. या साऱ्याच्या मागे नेमकं काय आहे? आपल्याला आजवर जे काही माहीत झालं आहे, जे ज्ञान मिळालं आहे, त्याच्याही पलीकडे प्रचंड बुद्धिमान अशी एखादी शक्ती या साऱ्या पसाऱ्यामागं असण्याची शक्यता आहे, असं विल्सन आपल्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात म्हणत असत. या निष्कर्षापर्यंत येण्यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रचंड काम केलं. मुंग्या हा त्यांच्या अभ्यासाचा विषय असल्यानं त्यांच्या विविध जाती शोधण्यासाठी त्यांनी खूप प्रवास केला. वेगवेगळ्या देशांमधे तर ते गेलेच; पण अनेक बेटांनासुद्धा त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह भेटी दिल्या. खूप भटकले. तिथं मुक्काम केले. संशोधन केलं. या साऱ्याची परिणती म्हणजे त्यांनी मुंग्यांच्या विविध अशा ४०० प्रजाती शोधून काढल्या.

**सृष्टीचा विचार करणारा निसर्गपुत्र**

मुंग्याच नाही, तर एकंदरच निसर्गाबद्दल त्यांना अगम्य कुतूहल होतं. मानवी समाजातल्या सर्वच घटकांचं वर्तन आणि त्यांच्या सवयी यामागं जनुकीय ठेवण हेच कारण असतं, असं विल्सन यांनी आपल्या १९७५ला प्रसिद्ध झालेल्या सोशिओबायोलॉजी – द न्यू सिन्थेसिस या पुस्तकात नमूद केलं. विल्सन यांच्या या विचारावरून बरंच वादळ उठलं. त्यांच्यावर टीकाही झाली. पण ते अविचल राहिले. त्यांचा सृष्टी विज्ञानाचा अभ्यास, कीटकशास्त्रामधे त्यांनी केलेलं अजोड काम यामुळे त्यांना मुंग्यांचा माणूस' असं म्हटलं जातं. उत्क्रांतीचं तत्त्व मांडणारे चार्ल्स डार्विन यांचा वारस असंही विल्सन यांना मानलं जातं.

# नैसर्गिक शेतीवर अधिक भर देण्याची गरज

## पर्यावरणप्रेमी लक्ष्मीकांत जोशी यांचे आवाहन

▶ प्रतिनिधी

माजलगाव : रसायनयुक्त शेतीमुळे आज मानवाला अनेक आजारांचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नैसर्गिक शेती ही आता काळाची गरज म्हणून पुढे येत असल्याचे प्रतिपादन विषमुक्त शेतीचे प्रचारक लक्ष्मीकांत जोशी यांनी केले.

दर्पण दिनानिमित्त राजलक्ष्मी गुळ उद्योग समूहाने येथील पत्रकारांचा सन्मान करून विषमुक्त शेतीचे महत्त्व पटवून दिले. यावेळी जोशी म्हणाले, की त्वरित उत्पन्न व जास्तीत जास्त नफा घेण्याच्या हव्यासापोटी जास्तीत जास्त शेतकऱ्यांकडून फळ, भाजीपाला, कडधान्य यावर विविध रसायनांचा मारा करून शेती शिकवल्या जात आहे. रासायनिक खतांच्या अतिरेकामुळे हे अन्न विश स्वरूपात माणसाच्या पोटात जात आहे त्यामुळे माणसाला अनेक आजारांचा सामना करावा लागत आहे. आम्ही पंधरा-वीस शेतकऱ्यांनी गेल्या अनेक वर्षापासून विषमुक्त शेतीचा प्रयोग सुरू केला आहे. त्यामुळे आमच्या परिवारासह या समूहातील ग्राहकांना दवाखान्याचे तोंड पाहण्याची वेळ आली नाही. त्यामुळे जनतेने नैसर्गिक शेतीतून पिकवल्या गेलेल्या अन्नाला प्राधान्य द्यावे.या समूहाने दर्पण दिनाचे औचित्य साधून पत्रकारांचा सन्मान केला. व नैसर्गिक असणारे गुळ पपई पाक केळी भेट देऊन विषमुक्त अन्न खाण्याचे आवाहन केले. तर पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले यांनी या वेळी मनोगत व्यक्त केले.यावेळी माजी उपनगराध्यक्ष सुनिल खंडागळे, कचरू खळगे, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम येवले तालुका अध्यक्ष उमेश मोगरेकर, पत्रकार पुरूषोत्तम करवा, दिनकर शिंदे, महेंद्र मस्के, राज गायकवाड, कमलेश जाब्रस, दता येवले, धनंजय माने, आदी पत्रकार बांधव व विषमुक्त शेती करणारे शेतकरी प्रकाश जाधव, राधाकिसन जाधव, बाबासाहेब पवार, माजी जि.प.सदस्य नारायण राठोड, शंकर मुठाळ, एम.आर.बादाडे, उद्धव सोनवणे आदी उपस्थित होते.



# 'जिव्हाळा'च्या शिबिरात १२८ जणांचे रक्तदान

▶ प्रतिनिधी

माजलगाव : राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त जिव्हाळा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित रक्तदान शिबीरात १२८ जणांनी बुधवारी रक्तदान केले.

या रक्तदान शिबीराचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी निलम बाफना यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून विद्युत वितरण कंपनीचे उपमुख्य कार्यकारी अभियंता सुहास मिसाळ, जय महेश शुगर इंडस्ट्रीजचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश लोखंडे, शेतकी अधिकारी सुजय पवार, प्रविण तिडके, लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे संचालक आण्णासाहेब तौर यांची उपस्थिती होती. जिव्हाळा प्रतिष्ठानच्या वतीने वृक्षारोपण, वृक्ष संगोपन, गडकिल्ले पद भ्रमंती , पुरग्रस्तांना मदत, अनाथ आश्रमांना मदत ,शालेय साहित्याचे वाटप यासह विविध सामाजिक कार्यक्रम आयोजित केले जातात. यावर्षी आयोजित रक्तदान शिबीरात १२८ जणांनी रक्तदान केले.



# 'श्री सिध्देश्वर'मध्ये राजमाता जिजाऊ जयंती

▶ प्रतिनिधी

माजलगाव : राजमाता जिजाऊ यांची ४२४ वी व स्वामी विवेकानंद यांची १५९ वी जयंती येथील श्री सिध्देश्वर माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह अमरनाथ खुर्पे, शाळेचे मुख्याध्यापक बाबुराव आडे, उपमुख्याध्यापक विजेंद्र चौधरी, पर्यवेक्षक उमेश थाटकर, कमलाकर झोडगे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मुख्याध्यापक बाबुराव आडे यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवन कार्याचा परिचय करून दिला तसेच या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, आभार व सूत्रसंचालन उपमुख्याध्यापक विजेंद्र चौधरी सर यांनी केले.

# मायावती बहुजनांचे सक्षम नेतृत्व : ॲड.अमोल डोंगरे

▶ प्रतिनिधी

बीड : देशातील वंचित, नडलेल्या-गांजलेल्या, पिळलेल्या बहुजन समाजाच्या एकमेव राष्ट्रीय नेत्या बहन मायावती यांच्या जन्मदिनानिमित्त जनकल्याणकारी दिनाचे आयोजन प्रदेश प्रभारी खासदार राम गौतम, प्रदेश प्रभारी प्रमोद रैना यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रदेशाध्यक्ष ड.संदीप ताजणे यांच्या आदेशाने बीड या ठिकाणी ६६ वा जन्मदिवस बहुजन समाज पार्टी बीड जिल्हा युनिटच्या वतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.ब हुजन समाज पार्टीच्या राष्ट्रीय अध्यक्ष तथा उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री बहन मायावती यांचा १५ जानेवारी २०२२ रोजी भारतभर जनकल्याणकारी दिवस म्हणून साजरा केला जातो. यावेळी बीड येथे बहन मायावतींचा जन्मदिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन समाज पार्टी बीड जिल्हा अध्यक्ष ड.अमोल डोंगरे यांनी बोलताना म्हटले की,

महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात लोकशाही आणली, लोकशाहीचे मूल्य रोवली आणि मौल्यवान असे संविधान दिले. देशातील शेवटच्या घटकातून भारताचा मुख्यवर्ती नायक-नायिका व्हावी, त्यांनी शासनकर्ते झाले पाहिजे असे डॉ.आंबेडकरांना अभिप्रेत होते, असेही डोंगरे म्हटले. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती प्रशांत वासनिक, सतिश कापसे, बाळासाहेब जगताप, संजय हराळ, यांची होती. तर रजनीकांत वाघमारे, कुमार फुलवरे, विकास डोंगरे, रोहन किर्ते, अविनाश पायके, सुधाकर खंदारे, शेख ताजीयोद्दीन यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



# चला जोडूया रक्ताचे नाते..

## तुळजाभवानी अर्बनचा रक्तदान शिबिरातून सामाजिक संदेश



▶ प्रतिनिधी

माजलगाव : क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त घेतलेल्या रक्तदान शिबिराला उदंड प्रतिसाद लाभला. दरम्यान, 'चला जोडूया रक्ताचे नाते' या ओळीप्रमाणे तुळजाभवानी अर्बन परिवाराने रक्तदान शिबिराच्या माध्यमातून सामाजिक संदेश दिला आहे.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन अर्जुन तनपुरे केले. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष ज्ञानेश्वर देशमुख, भारत होके पाटील, नरसिंग आघाव, पुरूषोत्तम जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. सहकार क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या तुळजाभवानी अर्बनने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आणि राष्ट्रमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जन्मोत्सवानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करून सामाजिक बांधिलकीचा वसा घेतला आहे. यावेळी ११४ रक्तदात्यांनी रक्तदान केले. या रक्तदान शिबीरास नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. शिबीर यशस्वी करण्यासाठी तुळजाभवानी अर्बनच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



## श्री सिताराम अर्बनचे उद्घाटन



माजलगाव : श्री सिताराम अर्बनचे शुक्रवारी उद्घाटन झाले. यावेळी माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, आर.टी.देशमुख, विरेंद्र सोळंके, चंद्रकांत शेजुळ, रविंद्र कानडे, श्री सिताराम अर्बनचे अध्यक्ष सुशिल डक आदी.

# विलास नेमाने यांना समाजभूषण पुरस्कार

▶ प्रतिनिधी

माजलगाव : राजे यशवंतराव होळकर यांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून धनगर समाज युवा मल्हार सेनेच्या वतीने समाजभूषण पुरस्काराने ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने यांना दि.१६ जानेवारी रोजी बीड येथे सन्मानित करण्यात आले.

बीड धनगर समाज युवा मल्हार सेनेच्या वतीने मोठा कार्यक्रम आयोजित करून समाजातील सामजिक काम करणाऱ्या व्यक्तींना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे. या वर्षीच्या समाजभूषण पुरस्काराचे वितरण दि.१६ जानेवारी रोजी बीड येथील राजमाता आहिल्याबाई होळकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून समाजात सामाजिक काम करणारे ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विलास नेमाने यांना समाज भुषण पुरस्कार बहुजन नेते तुकाराम येवले, मल्हार सेनेचे अशोकराव डोणे, प्रकाश सोनसळे पोलीस लिंबाजी महानोर, जय निर्मळ, शरद माळशिखरे, महाभारत गावडे, राहूल गुरव, ऋषीकेश सुरवशे, दिनकर शिंदे, पारखे, व समाज बांधव च्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम कोरोनाचे नियम पाळून अत्यंय साधरण पध्दतीने पार पडला.



# पुरस्कार प्राप्त शिक्षक संघाची कार्यकारिणी जाहीर

▶ प्रतिनिधी

माजलगाव : राष्ट्रीय,राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक संघ महाराष्ट्रची बीड जिल्हा कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी मिल्लिया गर्ल्स हायस्कुल न्ड ज्युनिअर कॉलेज बीडचे प्राचार्य सिद्दिकी मोहम्मद इरफान सादुल्लाह यांची तर सचिवपदी जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केसापुरी वसाहतचे प्राचार्य अभिमन्यु राम इबिते यांची निवड करण्यात आली.



दरवर्षी शिक्षक दिनाच्या औचित्याने भारत सरकारच्या वतीने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार आणि महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्य शिक्षक पुरस्कार देऊन गुणवंत शिक्षकांचा गौरव करण्यात येतो.अशा शिक्षकांना संघटित करून राष्ट्रीय,राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक संघ महाराष्ट्र या संघटनेची स्थापना श्रमिक आयुक्त यांच्या मान्यतेने करण्यात आली.

या संघाया बैठकीत बीड जिल्हा कार्यकारिणीची सर्वानुमते निवड करण्यात आली. अध्यक्ष सिद्दिकी मोहम्मद इरफान, उपाध्यक्ष शोभा तिडके, सचिव अभिमन्यु इबिते, सहसचिव गणेश स्वामी, सल्लागार प्रा.जे.एम.पैठणे, मार्गदर्शक शामसुंदर घाडगे, मुख्य संघटक आसाराम काशिद, संघटक संतोष पाडोळे, महिला प्रतिनिधी अनिता जोगदंड, कार्याध्यक्ष जगन्नाथ सोनवणे, कोषाध्यक्ष महादेव चव्हाण, संपर्क प्रमुख सोमनाथ वाळके, प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र लाड, संघटनेचे संस्थापक राज्याध्यक्ष सुभाष जिरवणकर, राज्यकार्याध्यक्ष दशरथ शिंगारे, राज्य कार्यकारिणी प्रसिद्धी प्रमुख हरिष हातवटे यांच्यासह पुरस्कार प्राप्त शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी बीड जिल्हा कार्यकारिणीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## दिव्यांगांच्या विकासाला गती



माजलगाव : समाजकल्याण जिल्हा परिषद बीडच्या वतीने दिव्यांग डि.एल.भालेराव आणि अंगद फडके यांना दुचाकी भेट देताना बीड जिल्हा परिषदेचे समाजकल्याण सभापती कल्याण आबुज आणि जिल्हा परिषद सदस्य चंद्रकांत शेजुळ.

## 'रेणुकामाता'मध्ये वर्धापनदिन साजरा



माजलगाव : रेणुकामाता मल्टीस्टेट माजलगाव शाखेच्या १३ व्या वर्धापनदिनानिमित्त खातेदारांचा गौरव करताना शाखा व्यवस्थापक कैलास भोसले, आणि कर्मचारी वृंद.

# हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमात महिलांचा सन्मान

▶ प्रतिनिधी

माजलगाव : शहरातील समता कॉलनी येथील दत्त मंदिरात हळदी-कुंकवाच्या कार्यक्रमा महिलांचा सन्मान करण्यात आला. मकर संक्रातीनिमित्त दि.१४ जानेवारीला रोजी हा कार्यक्रम पार पडला.

शहरातील समता कॉलनी येथील दत्त मंदिर परिसरात वारकरी संप्रदायाचे ह.भ.प.तुकाराम महाराज सोळंके व संस्थानचे ट्रस्टी यांच्या मार्गदर्शनाखाली विठ्ठल-रूख्माई, तुकाराम महाराज, ज्ञानेश्वर माऊली यांची मंदिरे बांधण्यात आली. या मंदिराच्या उभारणीत महिलांचा मोठा सहभाग आहे. सौ.धनश्री रत्नाकरराव देशमुख यांनी विठ्ठल रूख्माईची मूर्ती अर्पण केली. श्रीमती मस्केताई यांनी श्री तुकाराम महाराजांची मूर्ती तर डॉ.मिनाक्षी निळेकर यांनी श्री ज्ञानेश्वर महाराजांची मूर्ती मंदिरास अर्पण केली. या मंदिरात दररोज अभिषेक, काकडा, भजन, किर्तन आदिसांप्रदायिक कार्यक्रम चालतात. या कार्यक्रमात महिलांचा मोठा सहभाग असतो. मकर संक्रांत हा महिलांचा सण असतो. या कार्यक्रमानिमीत्त मंदिरात सौ.ज्योती सुनिल शिंदे यांनी विठ्ठल रूख्माई यांची भव्य अशी रांगोळी काढली. या कार्यक्रमानिमित्त आम्ही महिलांनी येणाऱ्या महिलांचा सत्कार केला. यामध्ये सौ.धनश्री रत्नाकर देशमुख व महिलांनी ज्ञानेश्वरीचे पारायण केले.



# ऊसतोड कामगारांना ५ हजार ब्लँकेटचे वाटप

## आमदार प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

▶ प्रतिनिधी

माजलगाव : माजलगाव मतदारसंघाचे विद्यमान आमदार प्रकाश सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्ताने ऊसाच्या फडावरील कामगारांना, बैलगाडीवरील मजुरांना ५ हजार ब्लँकेटचे वाटप करण्यात आले.

कोविड-१९ च्या नियमांचे पालन करून लोकनेते सुंदरराव सोळंके कारखान्याचे अध्यक्ष धैर्यशील सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास संचालक दत्तात्रय दुधाने, ज्ञानेश्वर होरमाळे, आबासाहेब गायकवाड, विष्णुपंत निरडे यांच्यासह माजी सभापती रवि सोळंके, विठ्ठल लगड, सर्जेराव लगड, राजेभाऊ काळे, व्यंकटराव मोरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रारंभी अध्यक्ष धैर्यशील सोळंके यांनी मनोगत व्यक्त करून आमदार प्रकाश सोळंके यांना संस्थेच्या वतीने जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमस्थळावर बैलगाडी मजुरांसह कारखान्याचे कार्यकारी संचालक एम.डी.घोरपडे यांच्यासह सर्व खाते, उपखातेप्रमुख उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मुख्य शेतकी अधिकारी एस.एस.खरात यांनी मानले.





## आमदार प्रकाशदादा सोळंके वाढदिवस विशेष

# विकासाचे व्हिजन असलेला नेता





**माजलगाव मतदारसंघाला विकासाचे व्हिजन असलेला नेता लाभला आहे. ते आमचे भाग्यच आहे. माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते आमदार प्रकाश सोळंके यांचा १४ जानेवारी हा वाढदिवस; त्यानुषंगाने जिल्हा परिषद समाजकल्याण सभापती कल्याण आबुज यांचा हा विशेष लेख 'वर्तमान'च्या वाचकांसाठी देत आहोत.**



निमित्त

**कल्याण आबुज**

सन २००२ च्या खानापूर ग्रामपंचायत निवडणुकीपासून ग्रामपातळीपासून माझ्या राजकीय कारकीर्दीस प्रारंभ झाला. तेंव्हापासून माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते प्रकाशदादा सोळंके यांच्या विचाराने भारावून गेलो तो आजतागायत. प्रकाशदादा सोळंके यांनी जातीपातीच्या राजकारणाला कधीच थारा दिला नाही. एक सर्व समावेशक व्यक्तीमत्व म्हणून प्रकाशदादा सोळंके यांच्याकडे पाहिले जाते. एक व्यापक राजकारणी म्हणून माझ्यासारख्या अनेक सामान्य कार्यकर्त्यासाठी प्रकाशदादा सोळंके सदैव आदर्शवत, प्रेरणादायी व्यक्तीमत्व आहेत. चौफेर विकास करणारे प्रकाश सोळंके अठरापगड जातींना बरोबर घेऊन राजकारण करत आहेत. कदाचित त्यांचा राजकारणाचा हाच केंद्रबिंदू म्हणावा लागेल.

माजलगाव पंचायत समितीचे सभापती ते राज्याचे मंत्री हा प्रकाशदादा सोळंके यांचा राजकीय प्रवास विकासाभिमुख राहिलेला आहे. विकास आणि जनतेचे कल्याण साधणारे प्रकाशदादा माझ्यासारख्या अनेक तरूण कार्यकर्त्यासाठी मार्गदर्शक ठरलेले आहेत. एक कुशल संघटक आणि विकासाचा दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून प्रकाशदादा सोळंके यांचे राजकारण पुढे जात आहेत. प्रकाशदादा सोळंके यांना माजलगाव मतदारसंघाचे भाग्यविधाते का? म्हणतात याचे कोडे त्यांच्या समवेत काम केल्यासच लक्षात येते हा माझा स्वानुभव आहे. विकासाच्या मुद्यावर कसलीच तडजोड प्रकाशदादांना मान्य नसते हे मी अनेकदा अनुभवले आहे. युवकांना मानाचे स्थान मिळावे, यासाठी प्रकाशदादा सोळंके नेहमी आग्रही असतात. अगदी ग्रामपंचायत पातळीपासून स्थानिक स्वराज्य संस्था, कृषी उत्पन्न बाजार समित्या, नगरपालिका, खरेदी-विक्री संघ, नगर पंचायतीसह विविध संस्थांवर युवकांना संधी देण्यात आली.

विकासाभिमुख नेतृत्व :

प्रकाशदादा सोळंके हे बीड जिल्ह्याच्या राजकीय पटलावर विकासाभिमुख नेतृत्व आहे. माजलगाव मतदारसंघ तीन तालुक्यांचा आहे. केवळ माजलगावच नव्हे तर धारूर, वडवणी तालुक्यांच्या विकासासाठी प्रकाशदादा आग्रही असतात. गावोगावी समाज मंदिरे, सभामंडप, अंगणवाडी, शाळेच्या इमारती, गावाअंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा योजना राबवून ग्रामीण भागात विकासाची गंगा पोहोचली पाहिजे हा दृष्टीकोन प्रकाशदादा यांच्या ठायी आहे. ग्रामीण भागातील कार्यकर्ता मोठा झाला पाहिजे, यावर प्रकाशदादा यांचा भर असतो.

प्रकल्प महर्षी :

पंचायत समिती सभापती ते राज्याचे मंत्री असा प्रकाशदादा सोळंके यांच्या राजकारणाचा चढता क्रम लागतो. सत्तेत कोणतेही पद मिळाले तरी त्यांचा जनतेच्या विकासासाठी सदुपयोग करणे याला प्रकाशदादा सोळंके प्राधान्य देतात. विकासमहर्षी तथा महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री सुंदररावजी सोळंके यांच्या समाजकारण, राजकारणाचा वसा आणि वारसा प्रकाशदादा सोळंके समर्थपणे पेलवत आहेत. सुंदररावजी सोळंके यांच्या प्रमाणेच विकासाचे प्रकल्प राबविण्यावर प्रकाशदादा सोळंके यांचा भर आहे. अनेक ठिकाणी गोदावरी नदीवर बंधारे बांधली. त्यात ढालेगाव, सादोळा, तारूगव्हाण, राजेटाकळी आदी ठिकाणी बंधारे बांधून हजारो हेक्टर जमीन सिंचनाखाली आणून शेकडो शेतकऱ्यांच्या जीवनात हरित क्रांती आणली आहे. सोन्नाखोटा प्रकल्प, लोणी-सावंगी उपसा जलसिंचन योजना मार्गी लावण्यासाठी प्रकाशदादा सोळंके यांना विकासाच्या बाबतीत प्रकल्प महर्षी म्हटले तर ते वावगे ठरणार नाही.

हजारो बेरोजगारांच्या हाताला काम :

प्रकाशदादा सोळंके यांचे राजकारण विकासाला धरून आहे. हजारो युवकांच्या हाताला हक्काचे काम देवून त्यांच्या संसारात आनंद निर्माण करण्याचे काम प्रकाश सोळंके करत आले आहेत. तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यामुळे परिसरातील शेतकरी सुखी झाला आहे. गेल्या ३० वर्षापासून हा साखर कारखाना प्रगती पथावर आहे. शेतमजूर, शेतकरी विकासाच्या प्रवाहात आणला आहे. साखर कारखान्यामुळे अनेकांच्या जीवनात विकासाची गंगा आणली आहे.

११५ कोटींचा निधी आणला :

प्रकाशदादा सोळंके राज्याचे पुनर्वसन मंत्री असताना माजलगाव धरणाच्या कार्यक्षेत्रात पुनर्वसन झालेल्या २२ गावांच्या सर्वांगीण विकासासाठी तब्बल ११५ कोटींचा निधी खेचून आणला. या निधीमधून २२ गावांचा विकास केला.

प्रशस्त इमारती उभारल्या :

प्रकाशदादा सोळंके यांनी प्रशासकीय कामांना गती मिळावी म्हणून खूप प्रयत्न केले. जीर्ण इमारती झाल्याने नव्या प्रशस्त इमारती उभारल्या. त्यात तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, न्यायालय इमारत, प्रशासकीय अधिकाऱ्यांची निवासस्थाने, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, आयटीआय कॉलेज, मुलींचे वसतिगृह आदी इमारती नव्या जागेत प्रशस्त उभारला. त्याचप्रमाणे उपजिल्हा रूग्णालयासाठी आमदार प्रकाश सोळंके यांचा पाठपुरावा सुरू आहे. माजलगाव नगरपालिकेच्या माध्यमातून भविष्यात मोठी विकासकामे होतील. शैक्षणिक पातळीवर मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे खुली केली. सिंदफणा पब्लिक स्कूलच्या माध्यमातून दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण दिले जात आहे. अशा या बहुआयामी व्यक्तीमत्वाला राजकारणात याहीपेक्षा मोठे यश मिळो, दीर्घायुष्य लाभो याच वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

(लेखक : बीड जिल्हा परिषदेत समाजकल्याण सभापती आहेत.)









आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.